महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ शनिवार, ६ जानेवारी २०१८

# 'बांधकामात वाळूऐवजी अन्य पर्याय वापरावेत'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

प्रातिनिधिक छायाचित्र



बांधकामांसाठी नद्या व समुद्रातून बेकायदा वाळू उपशाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. बांधकामांसाठी वाळूच्या वापराऐवजी बॉटम ॲश, कृत्रिम वाळू, फाउंड्री ॲश असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. या पर्यायांच्या वापरासाठी शहरातील बांधकाम व्यावसायिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वास्तुविशारद पूजा चाफळकर यांनी केले.

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत शुक्रवारी आल्टरनेट सॅन्ड या विषयावर चाफळकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. महोत्सवाच्या संयोजक सुप्रिया चित्राव या वेळी उपस्थित होत्या.

इमारती, उड्डाणपूल अशा विविध बांधकामांसाठी मोठ्या प्रमाणावर वाळू लागते. ही वाळू नदी अथवा समुद्रातून उपसली जाते. मात्र, वाळू हा अपारंपरिक घटक आहे. त्याची निर्मिती होऊ शकत नाही. वाळूच्या बेसुमार उपशामुळे जैवविविधतेला धोका निर्माण होतो. पूर, समुद्राचे अतिक्रमण वाढते. परिणामी सजीवसृष्टीला धोका पोहोचतो. त्यामुळे वेगळ्या पद्धतीने बांधकामांची रचना करणे आवश्यक आहे. सध्या बांधकामांदरम्यान फ्लाय ॲश, बॉटम ॲश, कृत्रिम वाळू, धातू ओतण्याच्या कारखान्यात निर्माण झालेली ॲश, नॉन प्लास्टरलेस पेस्ट, दगडांचा भुगा अशा अनेक पर्यायांचा वापर करता येऊ शकतो. शहरातील काही बांधकाम व्यावसायिकांनी त्याचा वापरही सुरू केला आहे. मात्र, जैवविविधता जपण्यासाठी भविष्यात अधिकाधिक बांधकाम व्यावसायिकांनी वाळूऐवजी या पर्यायांचा वापर करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# 'इको बाजार' प्रदर्शन सुरू

म. टा. प्रतिनिधी, पुणे



पं. जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन येथे भरविण्यात आलेल्या इको बाजार प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.

पर्यावरणस्नेही साहित्य वापरून बनविलेल्या वस्तू, सेंद्रिय खाद्य पदार्थ, कचरा जिरविण्यासाठी तयार केलेली उपकरणे, शोभिवंत वस्तूंचे अनेक प्रकार पुणेकरांना इको बाजार या अनोख्या प्रदर्शनात बघायला मिळत आहेत. शाश्वत विकासासाठी अधिकाधिक नागरिकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारावी, असा संदेश या प्रदर्शनातून देण्यात आला आहे.

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने घोले रोडवरील पं. जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनमध्ये हे प्रदर्शन भरविण्यात आले. येत्या ७ जानेवारीपर्यंत सकाळी ११ ते ८ या वेळेत खुले राहणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे शुक्रवारी उद्घाटन झाले. या वेळी प्रसिद्ध उद्योगपती अतुल किर्लोस्कर, गौरी किर्लोस्कर तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

पीक प्रक्रियेतील कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे मानवी आरोग्यावर होत असलेले दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी सेंद्रिय पदार्थांचा वापर करावा, असे आवाहन 'बाएफ'चे विद्यार्थी करीत आहेत. काळाच्या पडद्या आड गेलेल्या धान्याचे प्रकार, तांदळातील काही प्रकार त्यांनी मांडले आहेत. सेंद्रिय कडधान्ये, चटपटीत पदार्थ आणि पौष्टिक पदार्थांबरोबरच टाकाऊ वस्तूंपासून बनविलेल्या पिशव्या, फोल्डर्स, शोभिवंत वस्तू, दागिने आकर्षण ठरत आहेत. रासायनिक पदार्थांशिवाय कचरा जिरवण्यासाठी वापरता येईल अशी काही मॉडेल प्रदर्शनात स्वयंसेवी संस्थांनी सादर केली आहेत.

# 'नदीपात्रात मेट्रो म्हणजे पायावर कुऱ्हाड'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'नदीपात्रात मेट्रो उभारल्याने केवळ पर्यावरणाचाच नाही, तर सुरक्षिततेचाही मुद्दा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नदीपात्रात मेट्रोचे खांब उभारणे म्हणजे आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे,' असे परखड मत पर्यावरणवादी कार्यकर्त्या परिणिता दांडेकर यांनी व्यक्त केले.

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्री चित्रपट महोत्सवांतर्गत दिला जाणारा प्रतिष्ठेचा किर्लोस्कर वसुंधरा मित्र पुरस्कार यंदा दक्षिण आशियाई धरणे व नद्यांच्या अभ्यासक परिणिता दांडेकर, वन्यजीव चित्रपट निर्माते गुरमित सपाल आणि त्रिपुरामध्ये पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या यूथ फॉर इंटिग्रेशन संस्थेला जाहीर झाला. त्यानिमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. या वेळी वीरेंद्र चित्राव, सुप्रिया चित्राव उपस्थित होते.

श्रीमती दांडेकर म्हणाल्या, 'विकासविरोधी म्हणून हिणविले जाणारे पर्यावरणवादी कार्यकर्ते वगळल्यास नदीपात्रातून मेट्रोमार्गाच्या आखणीला कोणीही विरोध करताना दिसत नाही. महापालिका आणि राज्य सरकारकडूनच मेट्रोच्या रूपाने नदीपात्रात अतिक्रमण केले जात आहे. चेन्नईमध्येही अशाच पद्धतीने पूररेषेत अतिक्रमणे झाली होती. त्यामुळे मुसळधार पावसानंतर तेथे आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती. तेथील मेट्रो स्थानक पाण्यात बुडाले होते. त्याचप्रमाणे पुण्यातील धरणक्षेत्रातही अत्यंत कमी अवधीत मोठा पाऊस होतो. त्यामुळे अधिक क्युसेकने पाणी सोडावे लागते. परिणामी नदीपात्रातून मेट्रो नेल्यास पर्यावरणासोबत प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो.'

'नद्या कुलूपबंद केल्या जात आहेत. जलस्रोतांचे योग्य प्रकारे विश्लेषण केले जात नाही. राज्यातील एकाही धरणामुळे शंभर टक्के सिंचन होत नाही. जलविद्युत प्रकल्प नद्यांच्या वहनक्षमतेला मारक ठरणारे असतात. त्यामुळे नद्या वाचविण्यासाठी धोरण आखणे आवश्यक आहे,' असेही त्यांनी नमूद केले. लघुपट स्पर्धेतील विजेते जलालुद्दीन बाबा, किरण घाटगे, सुगंधी गदाधर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.